**International Journal of Advance and Applied Research**
**Peer Reviewed | International Open Access Journal**
**ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* [https://ijaar.co.in/](https://ijaar.co.in/)**
***Volume-13, Issue-3 | January – February 2026***

**Original Article**

# सातारा शहरातील ग्राहकांचा ऑनलाइन वस्तू खरेदीतील विवेकशील वर्तणुकीचा व राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा समीक्षात्मक अभ्यास

**डॉ. गजानन खामकर[1] , कु. श्रावणी कदम[2]**

*[1]सहाय्यक प्राध्यापक, [2]बी. कॉम.भाग 2 ,*

*[1]अर्थशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा.*

*[2]सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा*

**Manuscript ID:**
IJAAR-B130387
**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 3**
**January – February 2026**
**Pp. 572 - 575**

**Submitted:** 18 Jan.2026
**Revised:** 02 Feb. 2026
**Accepted:** 10 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***Corresponding Author:***
*डॉ. गजानन खामकर*

Quick Response Code:

**Website:** [https://ijaar.co.in/](https://ijaar.co.in/)

DOI: 10.5281/zenodo.20322625

DOI Link:
[https://doi.org/10.5281/zenodo.20322625](https://doi.org/10.5281/zenodo.20322625)

Creative Commons

OPEN ACCESS

***सार:***

*अलीकडील काळात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा झालेला विकास, लोकांची वाढत जाणारी कार्यमग्नता, लोकांच्या उत्पन्न पातळीत होत जाणारी वाढ, व्यक्तींच्या गरजांचे बदलत चाललेले स्वरूप या कारणांमुळे मोठ्या प्रमाणात लोकांकडून ऑनलाईन खरेदीचे प्रमाण वाढत चालले आहे. ग्राहकांनी वस्तूची खरेदी करत असताना विवेकशील वर्तणूक करणे गरजेचे असते म्हणजेच आपल्या मर्यादित उत्पन्नाच्या साह्याने अमर्यादित गरजा भागवण्यासाठी खर्च करत असलेल्या प्रत्येक रुपयापासून जास्तीत जास्त समाधान मिळवणे आवश्यक आहे. ऑनलाइन खरेदी करत असताना ग्राहकांमध्ये ही विवेकशील वर्तणूक आढळून येते का याचा अभ्यास या संशोधन पेपर मधून करण्यात आलेला आहे तसेच देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना वृद्धिंगत होणे गरजेचे आहे. ऑनलाइन खरेदी करणाऱ्या ग्राहकांमध्ये ही राष्ट्रीयत्वाची भावना आढळून येते का? याचाही अभ्यास सदर संशोधन पेपर मधून करण्यात आलेला आहे*

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*डॉ. गजानन खामकर. (2026). सातारा शहरातील ग्राहकांचा ऑनलाइन वस्तू खरेदीतील विवेकशील वर्तणुकीचा व राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा समीक्षात्मक अभ्यास. International Journal of Advance and Applied Research, 13(3), 572 - 575. [https://doi.org/10.5281/zenodo.20322625](https://doi.org/10.5281/zenodo.20322625)*

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

**प्रस्तावना :**

माहिती तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर ग्राहकांमध्ये ऑनलाइन खरेदीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. घरपोहच सुविधा, उपभोक्त्यांची वाढत असणारी खरेदीशक्ती , ऑनलाइन वस्तू खरेदीच्या वेळेस मिळणाऱ्या सवलती यामुळे बहुतांश ग्राहक ऑनलाइन वस्तू खरेदी करताना आपल्याला दिसून येत आहेत. या ग्राहकांचे विवेकशील वर्तन सदर संशोधनातून अभ्यासले आहे. देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत त्या देशातील लोकांमध्ये असलेली राष्ट्रभक्तीची भावना महत्त्वाची भूमिका बजावत असते. सातारा शहरातील लोकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना कितपत आहे? याचा अभ्यास सदर संशोधनात केला आहे.

**संशोधन समस्या :**

ग्राहकांकडे आपल्या अमर्यादित गरजा व मर्यादित साधने यांचा मेळ घालत असताना निर्माण होणारे आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी आपल्या जवळील संसाधनांचा विवेकशील वापर करावा लागतो. ऑनलाइन वस्तू खरेदी करताना ग्राहक ही विवेकशील वर्तन करतात का? याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. बऱ्याचदा ऑनलाइन वस्तू खरेदी करताना ग्राहक सारासार विचार न करता वस्तूंची खरेदी करतात व त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते. अलीकडील काळात माहिती तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर ग्राहकांमध्ये ऑनलाइन खरेदीचे प्रमाण वाढत आहे. त्यांचे या खरेदीतील वर्तन नेमके कसे असते याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. तसेच देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये लोकांच्या मध्ये असणारी राष्ट्रभक्तीची भावना महत्त्वाची असते. ऑनलाइन वस्तू खरेदी करताना सातारा शहरातील ग्राहकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना कितपत आहे? याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) अभ्यास क्षेत्रातील ग्राहकांची ऑनलाइन खरेदीच्या बाबतीतील विवेकशील वर्तन अभ्यासणे.
2) अभ्यास क्षेत्रातील ग्राहकांची राष्ट्रीयत्वाची भावना अभ्यासणे.
3) अभ्यास क्षेत्रातील ग्राहकांत राष्ट्रीयत्वाची भावना वाढविण्यासाठी व त्यांच्यात विवेकशील वर्तन घडविण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

**गृहितके :**

1) सातारा शहरातील ऑनलाइन खरेदी करणाऱ्या ग्राहकांचे वर्तन विवेकशील आहे.

2) सातारा शहरातील ऑनलाइन खरेदी करणाऱ्या ग्राहकांत राष्ट्रीयत्वाची भावना आहे.

**संशोधन पद्धती:**

1) **अभ्यास क्षेत्र** – सातारा शहरातील 18 ते 60 या वयोगटातील ग्राहक
2) **नमुना निवड** – साधा यादृच्छिक नमुना पद्धत वापरून सातारा शहरातील 209 ग्राहकांची निवड
3) **तथ्य संकलन** – प्राथमिक सामग्री – प्रश्नावली, निरीक्षण
4) **तथ्य विश्लेषण** – सारणी, शेकडवारी पद्धत, वृत्तालेख, स्तंभालेख
5) **अभ्यास कालावधी** – सप्टेंबर 2025
6) **संशोधन प्रकार** – अन्वेषणात्मक संशोधन
7) **संशोधन मर्यादा** – सातारा शहरातील 18 ते 60 वयोगटातील ऑनलाइन वस्तू खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या पुरते मर्यादित.

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

**तथ्य विश्लेषण व तथ्य निर्वचन:**

**तक्ता क्र. 1 ग्राहकांची विवेकशील वर्तणूक**

| अ. क्र. | घटक | ग्राहकांचे शेकडा प्रमाण | तथ्य निर्वचन |
|---|---|---|---|
| 1 | सण समारंभ वेळी खरेदी | 43.03 | गरजेच्या वेळी खरेदी |
| 2 | वस्तू खरेदी करताना उत्पादनाची वैशिष्ट्ये, वस्तूची किंमत, वस्तूविषयी इतर ग्राहकांचे मत या सर्व बाबी विचारात घेणे<br>ऑनलाइन खरेदीवर सवलत मिळत असल्यामुळे खरेदी करतात | 66.05 | वस्तू खरेदी करताना जागरूकता |
| 3 | ऑनलाइन खरेदीवर सवलत मिळत असल्यामुळे खरेदी करतात. | 50.7% | महत्त्वाचा लाभ मिळवण्यास प्राधान्य |
| 4 | कॅश ऑन डिलिव्हरी प्राधान्य | 70.8% | धोका कमी करणे |
| 5 | वस्तू घरपोहच झाल्यानंतर पॅकिंग वरील क्यूआर कोड नष्ट करतात | 59.3% | सुरक्षा प्राधान्य |
| 6 | **विवेकशील वर्तनूक असणाऱ्या ग्राहकांचे शेकडा प्रमाण** | **57.05** | **ग्राहकांची वर्तणूक विवेकशील आहे** |

संदर्भ – अभ्यास क्षेत्र सर्वेक्षण – सप्टेंबर २०२५

**तक्ता क्र. 2 ग्राहकांमधील राष्ट्रीयत्वाची भावना**

| अ.क्र | घटक | ग्राहकांचे शेकडा प्रमाण | तथ्य निर्वचन |
|---|---|---|---|
| 1 | भारतीय प्लॅटफॉर्मवर वस्तू खरेदी | 79.4 | राष्ट्रप्रेम |
| 2 | भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी स्वदेशीचा वापर करा या केलेल्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद | 94.7 | राष्ट्रहितास प्राधान्य |
| 3 | ऑफलाईन खरेदीमुळे भारतातील छोट्या मोठ्या व्यावसायिकांना फायदा होणार असेल, भारताचा जीडीपी वाढणार असेल, रोजगार निर्मिती होणार असेल तर ऑफलाईन खरेदी करण्याची तयारी | 89.50 | राष्ट्रहितास प्राधान्य |
| 4 | राष्ट्रीयत्वाची भावना असणाऱ्या लोकांचे सरासरी प्रमाण | 87.38 | स्वहितापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य देणाऱ्या ग्राहकांचे प्रमाण अधिक |

संदर्भ – अभ्यास क्षेत्र सर्वेक्षण – सप्टेंबर 2025

**निरीक्षणे:**

1) ऑनलाईन खरेदीमध्ये सर्वाधिक 43.3% खरेदी ही ग्राहकांकडून सन समारंभ असेल त्याच वेळेस केली जाते.
2) ऑनलाईन वस्तू खरेदी करताना 66.05% ग्राहक उत्पादनाची वैशिष्ट्ये, वस्तूची किंमत, वस्तूबद्दलची इतर ग्राहकांची मते या सर्व बाबी विचारात घेऊन खरेदी करतात.
3) ऑनलाईन खरेदी करताना 50.7% ग्राहक खरेदीवर सवलत मिळत असल्यामुळे ऑनलाईन खरेदी करतात.
4) ऑनलाईन खरेदीमध्ये सर्वाधिक 70.8% ग्राहक कॅश ऑन डिलिव्हरी करतात. म्हणजेच वस्तू मिळाल्यानंतर पैसे देण्यास प्राधान्य देतात.
5) वस्तू घरपोहच झाल्यानंतर त्याच्यावरील क्यू आर कोड 59.3% उपभोक्ते नष्ट करत नाहीत.
6) 79.4% ग्राहक भारतीय प्लॅटफॉर्मवर वस्तू खरेदी करण्याचा प्रयत्न करतात.
7) भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी स्वदेशीचा वापर करा या केलेल्या आवाहनाला 94.7% ग्राहकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.
8) ऑफलाईन खरेदीमुळे भारतातील छोट्या मोठ्या व्यावसायिकांना फायदा होणार असेल, भारताचा जीडीपी वाढणार असेल, रोजगार निर्मिती होणार असेल तर 89.5% उपभोक्ते ऑफलाईन खरेदी करण्यास तयार आहेत.

**गृहितक तपासणी:**

1) सातारा शहरातील 57.5% ग्राहकांची वर्गणूक विवेकशील आहे. (तक्ता क्र. 1)
2) सातारा शहरातील 87.38% ग्राहकांत राष्ट्रीयत्वाची भावना आहे. (तक्ता क्र. 2)

**उपाययोजना:**

1) सातारा शहरातील ग्राहकांची वर्तणूक विवेकशील होण्यासाठी तसेच त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना वाढविण्यासाठी एन. जी. ओ. मार्फत जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.
2) महाराष्ट्र शासन माध्यमिक अभ्यासक्रमात अर्थशास्त्र विषय समाविष्ट करावा.
3) उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांनी विनामूल्य उपक्रम अंतर्गत स्थानिक पातळीवर ग्राहकांची वर्गणूक विवेकशील होण्यासाठी तसेच त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना वाढविण्यासाठी जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची:**

1. डॉ. गुरुनाथ नाडगोंडे (2012) सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन कोल्हापूर
2. Reserve Bank of India ( 2024 - 2025) Handbook on Statistics of Indian Economy
3. C.R. Kothari, Gaurav Garg(2019): Research Methodology Methods and Techniques, New Age International Publishers; Fourth edition